# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः24.04.2024** **वारःबुधवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात सर्व पक्षांचा झंझावाती प्रचार, प्रचाराचा आजचा अंतिम दिवस.
2. पंतजली आयुर्वेदसह अन्य सर्वच दिशाभूल जाहिराती करणाऱ्या FMCG कंपन्यांवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे
3. नेदरलँड्समधल्या 26व्या विश्व ऊर्जा परिषदेमध्ये भारताच्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि ऊर्जा निर्मिती प्रणालीचं प्रदर्शन आणि
4. आगामी जागतिक ॲथलेटिक्स साखळी स्पर्धेसाठी भारताच्या 15 खेळाडुंचा संघ जाहीर.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार देशभरात जोरात सुरू आहे; या प्रचाराचा आज शेवटचा दिवस असणार आहे. या दुसऱ्या टप्प्यासाठी शुक्रवारी 26 एप्रिलला देशातली 13 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या 89 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगडमधल्या जंजगीर चंपा लोकसभा मतदारसंघात आणि त्यांनी महासमुंद लोकसभा मतदारसंघांतर्गत धमतरी शहरात काल जाहीर सभा घेतली. तत्पूर्वी, मोदींनी राजस्थानमधल्या टोंक-सवाई माधोपूर लोकसभा मतदारसंघातल्या उनियारा इथं निवडणूक रॅलीला संबोधित केलं. तर, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस जयराम रमेश यांनीही काल उदयपूरमध्ये पत्रकार परिषद घेतली.

उत्तर प्रदेशमध्येही, भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांनी काल गौतम बुद्ध नगर जिल्ह्यात महेश शर्मा यांचा प्रचार केला. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही मेरठमध्ये अरुण गोविल यांच्यासाठी काल रोड शो आयोजित केला होता. तर आदल्या दिवशी त्यांनी पश्चिम उत्तर प्रदेशातल्या अमरोहा आणि बागपत जिल्ह्यांमध्येही रॅलींमध्ये सहभाग घेतला. तसंच समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी बिजेंद्र सिंह आणि हाथरसमधून जसवीर बाल्मिकी यांच्यासाठी प्रचार फेरी काढली. बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांनीही मेरठ जिल्ह्यात देवव्रत त्यागी यांच्यासाठी एका रॅलीला संबोधित केलं. मध्य प्रदेशमध्ये भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनीही अनेक प्रचार सभांना संबोधित केलं.

कर्नाटकमध्ये काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा यांनी चित्रदुर्ग इथं जाहीर सभा घेतली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काल केरळमध्ये वायनाडमध्ये एक जाहीर सभा घेतली. काँग्रेसचा जाहीरनामा गरीब, तरुण, शेतकरी आणि महिलांसाठी आहे, असं खर्गे यावेळी म्हणाले. त्याआधी चेंगन्नूर इथंही त्यांनी जाहीर सभा घेतली. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी पश्चिम बंगालमधल्या रायगंज लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा घेतली. बिहारमध्ये एनडीए, महाआघाडी आणि इतर पक्षांचे ज्येष्ठ नेते आणि प्रचारकांनी भागलपूर, कटिहार, पूर्णेया, बंका आणि किशनगंज लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी जोरात प्रचार करत आहेत.

भाजप नेते राजनाथ सिंह यांनी भागलपूरमध्ये जेडी(यू) उमेदवाराच्या समर्थनार्थ जाहीर सभा घेतली. JD (U) अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही कटिहार आणि पूर्णिया इथं निवडणूक रॅलींना संबोधित केलं. दुसरीकडे, आरजेडी नेते

तेजस्वी प्रसाद यादव यांनीही भागलपूर, कटिहार आणि मुंगेर इथं जाहीर सभा घेतल्या. महाराष्ट्रात भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल अकोल्यात भाजप उमेदवार अनुप धोत्रे यांच्यासाठी एका प्रचार सभेला संबोधित केलं. अकोल्यात काँग्रेसनं डॉ. अभय पाटील यांना उमेदवारी दिली असून, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकरही या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. या जागेसाठी 26 एप्रिलला मतदान होणार आहे.

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीबाबत आपण गंभीर असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्याबद्दल पतंजली आयुर्वेदाच्या प्रलंबित अवमान प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की ते केवळ पतंजली आयुर्वेदासाठीच नाही तर ज्या कंपन्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरात करणाऱ्या कंपन्यांच्या विश्वासार्हतेला देखील ते बाधक आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध केल्याप्रकरणी पतंजली आयुर्वेद विरुद्ध प्रलंबित अवमान प्रकरणावर न्यायालयात सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयानं हे स्पष्टीकरण दिलं आहे. न्यायालयानं याचिकाकर्त्या भारतीय वैद्यकीय संघटनेला सुद्धा ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या अनैतिक पद्धतींच्या तक्रारींबाबतही सावध केलं. याशिवाय गेल्या तीन वर्षांत दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर सरकारने केलेल्या कारवाईबाबत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्रीय मंत्रालयांना दिले आहेत.

**<u>राष्ट्रपती-उत्तराखंड दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, सध्या उत्तराखंडच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत, त्या आज डेहराडून इथल्या वन संशोधन विद्यापीठातील भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांच्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या दीक्षांत सोहळ्यात इंदिरा गांधी राष्ट्रीय वन अकादमीचे 99 अधिकारी आणि भूतानच्या दोन प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना पदवी प्रदान करण्यात येईल.

**<u>जागतिक ऊर्जा काँग्रेस</u>**

नेदरलँड्समधल्या रॉटरडॅम इथं आयोजित 26 व्या विश्व ऊर्जा परिषदेमध्ये भारत आपलं नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि ऊर्जा निर्मिती प्रणालीचं प्रदर्शन करत आहे. ही परिषद उद्यापर्यन्त चालणार आहे. नेदरलँडच्या उपपंतप्रधानांनी इंडिया पॅव्हेलियनला काल भेट दिली. भारताचं ऊर्जा मंत्रालय, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, कोळसा मंत्रालय आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इंडिया पॅव्हेलियनमध्ये सहभागी झाले आहेत. ऊर्जा मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल आणि नेदरलँडमधील भारतीय राजदूत रीनत संधू यांच्या हस्ते या पॅव्हेलियनचं काल उद्घाटन करण्यात आलं.

**<u>युक्रेन उप परराष्ट्र मंत्री</u>**

युक्रेनचे भारतीय राजदूत हरीश जैन यांनी काल कीव इथं युक्रेनचे नवनियुक्त उपपरराष्ट्र मंत्री एनड्री सिबिहा यांची भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं. उभय नेत्यांनी द्विपक्षीय संबंध तसंच परस्परहिताच्या अनेक मुद्द्यांवर चर्चा केली असल्याचं युक्रेन मधील भारतीय दुतावासानं आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. तसचं भारतानं युक्रेनला मनुष्यबळाची मदत करण्यासंबंधीही यावेळी चर्चा करण्यात आली.

**<u>कतार नेपाल भेट</u>**

कतारचे राजे शेख तमिम बिन हमद अल थानी काल दोन दिवसीय राजकीय दौर्यासाठी काठमांडूला पोहोचले. नेपाळचे राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी त्यांना मैत्रीपूर्ण भेटीचं आमंत्रण दिलं होतं. यावेळी नेपाळी सेनेकडून कतारच्या राजांना मानवंदना देण्यात आली. नेपाळ मधील गुंतवणूक वाढवणं, जलवायू परिवर्तन आणि इस्त्राईल हमास युद्धामध्ये बेपत्ता झालेला नेपाळी विद्यार्थी बिपीन जोशीची सुटका यासह स्वीपक्षीय संबंध आणि राजकीय संबंधित विषयांवर यावेळी चर्चा झाली.

**क्षेपणास्त्र**

मध्यम-श्रेणीच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या नवीन प्रकाराचं काल स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या नेतृत्वाखाली यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. क्षेपणास्त्राच्या या यशस्वी प्रक्षेपणानं कमांडची परिचालन क्षमता सिद्ध केली असून नवीन तंत्रज्ञानाचं प्रमाणीकरण केलं आहे, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**भारत ओमाण**

भारतीय तटरक्षक दल आणि रॉयल ओमान पोलीस कोस्ट गार्ड यांच्यात समुद्रातील आंतरराष्ट्रीय बेकायदेशीर कारवायांचा सामना करण्यासाठी आणि प्रादेशिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी 5 वी उच्च-स्तरीय वार्षिक बैठक काल नवी दिल्लीत झाली. या उच्च-स्तरीय चर्चेचं नेतृत्व भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांनी केलं, तर रॉयल ओमान पोलीस कोस्ट गार्ड शिष्टमंडळाचं नेतृत्व असिस्टंट ऑफिसर कमांडिंग कर्नल अब्दुल अझीझ मोहम्मद अली अल जबरी यांनी केलं.

**DRDO-जॅकेट**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात DRDO ने दारुगोळ्याच्या सर्वाधिक धोक्यापासून बचावात्मक संरक्षणासाठी सर्वात हलक्या वजनाचं बुलेट प्रूफ जॅकेट विकसित केलं आहे. या बुलेट प्रूफ जॅकेटची नुकतीच चंदीगड इथं यशस्वी चाचणी घेण्यात आली. हे विशेष बुलेट प्रूफ जॅकेट तयार करण्यासाठी विशेष प्रकारची सामग्री वापरण्यात आल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. या जॅकेटच्या निर्मितीबद्दल DRDO चे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी DRDOच्या संबंधित चमूचं अभिनंदन केलं आहे.

**जागतिक स्पर्धा रिले**

भारतानं जागतिक ॲथलेटिक्स साखळी स्पर्धा 2024 साठी 15 खेळाडूंच्या संघाची घोषणा केली आहे. आगामी पॅरीस ऑलीम्पिकच्या पात्रतेसाठी 4 आणि 5 मे दरम्यान बहामास मधील नासौ मध्ये या स्पर्धा होणार आहेत. हे स्पर्धक 400 मीटर रिले प्रकारात पुरुष, महिला आणि मिश्र प्रकारात भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. पुरुषांचा 8 सदस्यांचा संघ निश्चित केला गेला असून यामध्ये 2023 मधील हान्झू आशियायी खेळात सुवर्ण पदक विजेता अमोज जेकब, मुहम्मद अनास याहीया, मुहम्मद अजमल आणि राजेश रमेश या खेळाडूंचा समावेश आहे. महिलांमध्ये 400 मीटर रिले प्रकारात आशियायी खेळांची सुवर्णपदक विजेती एम. आर. पूवाम्मा च्या नेतृत्वाखाली सात खेळाडूंच्या संघाची घोषणा केली गेली आहे. सुरुवातीला प्रत्येक सामन्यातील विजेते 2 संघ अंतिम सामन्यात पोहोचतील. दुसऱ्या दिवशी अंतिम सामना होणार आहे. या प्रक्रियेमधून दोन्ही संघातील खेळाडू 2024 च्या आगामी पॅरीस ऑलीम्पिकसाठी निवडले जातील. अन्य संघ दुसऱ्या दिवशी पुन्हा स्पर्धा करून पॅरीस ऑलीम्पिकसाठी पात्र ठरतील.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार